थोडक्यात...

धीरज आघाव याचे एनएमएमएस परीक्षेत यश

(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

सेलू – शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी धीरज विठ्ठल आघाव इयत्ता आठवीच्या वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षेत शिष्यवृत्ती धारक झाला आहे. स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष हरिभाऊ चौधरी ,स्थानिक कार्यवाह उपेंद्र बेल्लुरकर ,शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी ,मु.अ. शंकर शितोळे ,रागिणी जकाते ,अनिल कौसडीकर ,विनोद मंडलिक ,गजानन साळवे यांनी यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

आज सेलू येथे मोफत व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन

(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

सेलू – येथे सिसोदे हेल्थ केअरतर्फे उद्या रविवार दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता बाबासाहेब मंदिराच्या बाजूस मोफत व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सेलू येथे प्रथमच मोफत व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात नाशिक येथील प्रसिद्ध व्यसनमुक्ती तज्ञ पद्मश्री डॉ राजन पाटील उपस्थित असणार आहेत. दारू, गुटखा, सिगारेट, तंबाखू सोडवण्यासाठी काय केले पाहिजे, यामधून कसे कायमचे बाहेर पडता येईल याबद्दलचे पूर्ण मार्गदर्शन व औषध उपचार याबद्दलची पूर्ण सविस्तर माहिती या शिबिरामध्ये देण्यात येणार आहे. त्याचबरोबर महिलांचे आजार, शुगर, मूळव्याध, मुतखडा, दमा आणि इतर सर्व साधारण आजारावर आयुर्वेदिक औषध उपचार कोणते घ्यायचे या बद्दल त्यांचे मार्गदर्शन मिळणार आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिसोदे हेल्थकेअरचे संचालक विनायक जोशी यांनी केले आहे.

काचीगुडा एक्स्प्रेसमध्ये तीन आरक्षित डब्यांची वाढ

परभणी– दक्षिण मध्य रेल्वेने प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेवून काचीगुडा–नगरसोल– काचीगुडा एक्स्प्रेस मध्ये एक आरक्षित वातानुकुलीत खुर्चीयान आणि दोन दुसऱ्या श्रेणीची आरक्षित खुर्ची यान डब्यांची कायमस्वरूपी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने दिली. ७ एप्रिल रोजी काचीगुडा येथून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६१ काचीगुडा–नगरसोल व ८ एप्रिल रोजी नगरसोल येथून सुटणाऱ्या गाडी क्रमांक १७६६२ नगरसोल– काचीगुडा एक्स्प्रेस मध्ये एक आरक्षित वातानुकुलीत खुर्ची यान आणि दोन आरक्षित दुसऱ्या श्रेणीची खुर्ची यान डब्यांची कायमस्वरूपी वाढ करण्यात येणार आहे. या गाडीच्या डबे वाढी नंतर या गाडी मध्ये १७ जनरल, ०२ आरक्षित दुसऱ्या श्रेणी ची खुर्ची यान (चेयर कार), एक आरक्षित वातानुकुलीत खुर्ची यान (एसी चेयर कार) आणि दोन एसएल आर आसे एकूण २२ डबे असतील. या गाडीचे आरक्षण ५ एप्रिलपासून उपलब्ध होईल याची प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहन दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड जनसंपर्क विभागाने केले आहे.

सावरखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षणाधिकारी संदीपकुमार सोनटक्के यांची भेट

(महेंद्र पुरी/ दै.धर्मयोध्दा)

हिंगोली - तालुक्यातील सावरखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस हिंगोली चे शिक्षणाधिकारी संदीप कुमार सोनटक्के यांनी आज अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली.

आज दि ५/४/२०२५ रोज शनिवारला सकाळी जिल्हा परिषद चे शिक्षणाधिकारी संदिप कुमार सोनटक्के साहेब यांनी जि.प.प्रा.शा सावरखेडा येथे भेट दिली यावेळी त्यांनी निपुण महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबावणी बाबत तपासणी केली तसेच विद्यार्थी वाचन घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणी केली. तसेच शिक्षकांना सुद्धा मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी शिक्षणाधिकारी संदीप कुमार सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत तसेच शाळेच्या प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कैलास धनवे, सहशिक्षक सुभाष कोटकर, श्रीमती कावरखे ताई, श्रीमती अनुसया देशमुख ताई यांची यावेळी उपस्थिती .

अवकाळी पावसाने शेतकऱ्याच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान

बाधित क्षेत्राचे पंचनामे करून त्वरित नुकसान भरपाईची मागणी

परभणी- जिल्हयात अचानकपणे आलेल्या वादळ, वारे व अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्या बाधित क्षेत्रांचे पंचनामे करुन त्वरीत नुकसान भरपाई देणे बाबत.. परभणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले, दि ०३.०४.२०२५ रोजी परभणी जिल्हयात बऱ्याच सर्वदूर भागात अचानकपणे आलेल्या वादळ, वारे व अवकाळी पाऊस काही प्रमाणात गारपीट यामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे गहू, ज्वारी, करडई, फळबागा ईत्यादी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने व अवकाळी पाऊस यामुळे शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान झाले आहे. त्यांचे त्वरीत पंचनामे करुन जिल्हयातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन मदत करावी. अशी मागणी माजी खासदार तथा शिवसेना संपर्कप्रमुख सुरेश रामराव जाधव पाटील यांनी जिल्हाधिकारी रघुनाथ गावंडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

गंगाखेड रेल्वे ओव्हर ब्रीज रद्द करण्याची शिफारस

रेल्वे विभागाचा निर्णय खासदार जाधव यांची मागणी

परभणी - गंगाखेड – परळी रेल्वे मार्गावर प्रस्तावित रेल्वे ओव्हर ब्रीज रद्द करण्याची शिफारस रेल्वेच्या महाप्रबंधक अरूणकुमार जैन यांनी केली आहे. गंगाखेड शहराच्या बाहेर रेल्वे ट्रॅक हलविण्याच्या निर्णयामुळे हा ओव्हर ब्रीज काहीच उपयोगाचा ठरणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, रेल्वे विभागाने ओव्हर ब्रीजचे बांधकाम रद्द करण्याची शिफारस केली आहे. याविषयी खासदार संजयजाधव यांनी देखील रेल्वे ओव्हर ब्रिज रद्द करण्याची मागणी केली होती.

गंगाखेड शहरात होणाऱ्या वाहतुकीच्या अडथळ्यामुळे गेल्या काही वर्षांपासून रेल्वे ओव्हर ब्रीजच्या बांधकामाची मागणी होत होती. वारंवार बंद होणाऱ्या रेल्वे फाटकांमुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या प्रमाणात ट्रॅफिक जामचा सामना करावा लागत होता. यामुळे, गंगाखेड – परळी मार्गावर ओव्हर ब्रीज बांधण्याच्या गरजेवर भर दिला जात होता. पण, आता रेल्वे विभागाने गंगाखेड – परळी वैजनाथ मार्गाचे दुहेरीकरण करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. यामुळे गंगाखेड शहराच्या बाहेर रेल्वे ट्रॅक हलविण्याचा निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे, गंगाखेड शहराच्या आत असलेली जुनी रेल्वे लाईन बंद होऊ शकते. त्यानुसार, त्या जुन्या मार्गावर उभारण्यात येणारा ओव्हर ब्रीज कदाचित उपयोगी पडणार नाही, अशी शक्यता रेल्वे महाप्रबंधक अरूणकुमार जैन यांनी १३ मार्च रोजी दिलेल्या शिफारशीत मांडली आहे. परभणीचे खासदार संजय जाधव यांनी या मुद्द्यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी १ एप्रिल रोजी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे लेखी मागणी केली आहे की, हा ओव्हर ब्रीज रद्द करण्यात यावा. खासदार जाधव यांचे म्हणणे आहे की, ओव्हर ब्रीज बांधणीसाठी शासनाचा निधी खर्च केला जाईल, जो नंतर उपयोगी पडणार नाही. यामुळे शासनाच्या पैसे वाया जाण्याची शक्यता आहे, अशी त्यांनी भिती व्यक्त केली आहे. रेल्वे विभागाने गंगाखेड शहरातील रेल्वे मार्ग बदलण्याच्या निर्णयामुळे हा ओव्हर ब्रीज प्रकल्प थांबवण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो.

छत्रपती शिवरायांबद्दल अपमानजनक वक्तव्य करणाऱ्यांविरोधात केंद्र सरकार आणणार कायदा

सातारा - गेल्या काही दिवसापासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतीत अवमानजनक वक्तव्य केल्याची प्रकरणे समोर आली होती. यावर आता कायदा होणार असल्याची माहिती उदयनराजे भोसले यांनी दिली. या कायद्याची घोषणा स्वत: केंद्रीय मंत्री अमित शाह रायगडावरुन येऊन करणार असल्याची माहिती खासदार भोसले यांनी दिली. काही दिवसापूर्वी अमित शाह यांची भेट घेऊन या कायद्याची मागणी खासदार भोसले यांनी केली होती. खासदार उदयनराजे भोसले म्हणाले की, या महिन्यात १२ तारखेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त किल्ले रायगडावर गृहमंत्री अमित शहा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या माध्यमातून घोषणा होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांविरोधात मी जी इच्छा व्यक्त केली होती, त्या कायद्याची घोषणा झाली तर याला वेगळे महत्व प्राप्त होईल, असेही उदयनराजे भोसले म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबतीत प्रशांत कोरटकर यांनी विधान केले होते. या प्रकरणी राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. महापुरुषांचा अवमान आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकावणे, या प्रकरणातील नागपुरातील आरोपी प्रशांत कोरटकर याचे वकील सौरभ घाग यांनी गुरुवारी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अपील अर्ज केला. यावर उद्या, शनिवारी किंवा सोमवारी दोन्ही बाजूंच्या वकिलांकडून युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. चौथे सहदिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांनी मंगळवारी कोरटकर याचा जामीन अर्ज नामंजूर केला होता. त्यामुळे कोरटकर याचा मुक्काम कळंबा कारागृहात वाढला आहे. नवीन अर्जावर सरकारी वकील, पोलिस विभागातील तपास अधिकारी, फिर्यादी इंद्रजित सावंत यांचे म्हणणे घेतले जाणार आहे. त्यानंतर जामीनवर निर्णय होणार आहे.

टरमाईन इंजेक्शनची विक्री करणाराविरुध्द गुन्हा दाखल

परभणी– झटपट शरिरयष्टी कमविण्यासाठी जीम मधील तरुणांना टरमाईनसारख्या घातक इंजेक्शनची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीविरुध्द येथील नवा मोंढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख महेबुब शेख माजीद हा व्यक्ती औषध विक्रीचा परवाना नसतांनासुध्दा प्रतिबंधित टरमाईन इंजेक्शन जीम मधील तरुणांना विक्री करण्यासाठी स्वतःजवळ बाळगतांना आढळून आला. पोलिसांनी कस्तुरबा गांधी विद्यालय मैदान परिसरात ४ एप्रिल रोजी दुपारी ३.३० वाजता या व्यक्तीविरुध्द कारवाई करीत त्याच्याजवळील १० हजार रुपये किमतीच्या टरमाईन इंजेक्शनच्या ३० बॉटल आणि एक दुचाकी असा एकूण ६० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. औषध निरीक्षक मनोज पैठणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी शेख महेबुब शेख माजीद याच्याविरुध्द नवा मोंढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मालेगांवात जिजाऊ रथयात्रेच्या नियोजना संदर्भात बैठक संपन्न

१९ एप्रिल रोजी मालेगाव येथे रथयात्रेचे होणार आगमन

(प्रदिप सावले /दै.धर्मयोध्दा)

मालेगाव -जिजाऊ रथयात्रा मराठा जोडो अभियान हे १९ एप्रील रोजी मालेगांव येथे सकाळी १० वाजता येत आहे . त्या निमित्त मालेगांव येथील मराठा सेवा संघाची नियोजन संदर्भात सभा ४ एप्रिल रोजी पार पडली या सभेत मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष शिवश्री अशोकराव महाले, जिल्हाध्यक्ष नारायण काळबांडे, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्ष सुरेखाताई आरू, विभागीय सचिव सविताताई बोरकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विकास गवळी, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष वसंतराव अवचार, प्रा भरत आव्हाळे, विभागीय सचिव प्रा अनंत गायकवाड,विभागिय कार्याध्यक्ष प्रवीण पाटील, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश सुर्वे,ॲड शंकरराव मगर,आदी पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ही सभा पार पडली आज समाजासमोर मोठी आवाहने उभी आहेत जातीयवाद, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, धार्मिक आणि राजकीय उन्माद, यासारख्या अनेक कारणांनी सामाजिक एकता धोक्यात आली आहे धार्मिक सलोखा दुभंगला आहे आणि समाजाची मजबूत विन विस्कटत चाललेली आहे त्यामुळे समाजमन अस्वस्थ, संशयग्रस्त, आणि असुरक्षित झाले आहे,त्याचा थेट परिणाम आपल्या सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेवर होत आहे ही परिस्थिती बदलण्यासाठी युवक, युवती, विद्यार्थी, शेतकरी, प्रौढ महिला, पुरुष यांच्याशी संवाद साधण्यासाठी समाज एकसंघ करण्यासाठी तसेच राष्ट्र उभारणीच्या कार्यात बंधुभाव जपण्यासाठी आणि ऐक्याचा जागर घालण्यासाठी मराठा सेवा संघाच्या माध्यमातून जिजाऊ रथयात्रा २०२५ अर्थात मराठा जोडो अभियान हे संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमण करून १८ एप्रिल रोजी वाशिम जिल्ह्यामध्ये येत आहे. ही रथयात्रा शनिवार दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता मालेगाव शहरात दाखल होत आहे या सभेच्या माध्यमातून मालेगाव येथे भव्य सभेचे आयोजन करण्यात येणार असून त्या संदर्भात नियोजनासाठी सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या वेळी आ.अमितभाऊ झनक यांनाही जिजाऊ रथ यात्रेत सहभागी होण्याचे निमंत्रण देण्यात आले या सभेचे संचालन नागेश कव्हर,प्रास्ताविक प्राचार्य वसंतराव अवचार यांनी तर आभार प्रदर्शन प्रशांत वाझुळकर यांनी केले,सभेला मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष तेजराव पाटील जाधव, तालुका सचिव अशोकराव जाधव, साहेबराव कढणे, श्रीराम अवचार, दिनकरराव पोफळे,प्रवीण अवताडे, विश्वनाथ शिंदे शालिग्राम चव्हाण, डॉ पंकज बोरकर, बबनराव जाधव, नारायण चव्हाण, सुनील देवळे, विनोद वाघ, माधवराव वानखेडे, संतोष देवकर, केशव देवकर, माधव बोरकर, शेषराव जाधव, यांच्यासह जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती संध्या आव्हाळे, कामिनी अवचार, कल्पना कढणे, रंजना मगर, निर्मला पळसकर, जिजाऊ ब्रिगेड तालुकाध्यक्ष विद्युलता गायकवाड,गीताताई रंजवे,सौ रेखा गवळी आदींची उपस्थिती होती .

ताडकळस येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी सचिन सिद्धार्थ मगरे यांची निवड

(वजीर पठाण /दै.धर्मयोध्दा)

ताडकळस - पुर्णा तालुक्यातील ताडकळस येथील दर वर्षी प्रमाणे याही वर्षी ताडकळस येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अगदी उत्साहात साजरी केली जाणार असून या संदर्भात उत्सव समितीची महत्त्वपुर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी सचिन सिद्धार्थ मगरे, पदी यांची सर्वानुमते व बिनविरोध निवड करण्यात आली. स्वागतअध्यक्ष पदी संजय जल्हारे,सचिव निखिल मगरे, मुख्य प्रवर्तक सुरेश मगरे, उपाध्यक्ष आकाश मगरे, कोषाध्यक्ष राहुल मगरे, सल्लागार सुरेश गायकवाड, संघटक आकाश मगरे, सहकोषाध्यक्ष रोहन तिगोटे, सहसंघटक आत्माराम हंकारे, सहसचिव सुरज मगरे, कार्यध्यक्ष शुभम डहाळे, कार्यवाहक अमोल मगरे, सहकार्यवाहक स्वप्निल सानके, राजु, मगरे, भिमराव गायकवाड, व इतर पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.

इग्राईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस् फाउंडेशन यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी केले रॉकेट लॉन्चिंग

(विवेक भुतेकर/ दै.धर्मयोध्दा)

मंठा – भारतीय अंतराळ संस्था इस्रोच्या अंतर्गत चालणारी संस्था इग्राईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस् फाउंडेशन (आयडीवायएम) यांच्या मार्गदर्शनाने मंठा येथील विद्यार्थी पुजा वायाळ आणि महेश वायाळ यांनी पर्यावरणास अनुकूल असे यशस्वीरित्या रॉकेट प्रक्षेपण केले. यावेळी

पुजा वायाळ हिने सांगितले की, लहानपणी या सगळ्या गोष्टी टीव्ही व मोबाईल वर पहात असे की कश्याप्रकारे रॉकेट प्रक्षेपित होतात. एक स्वप्न होत की मी एक दिवस भारत देशासाठी रॉकेट लाँच करेल आणि मी हे स्वप्न पूर्ण केलं. रॉकेट बनऊन त्याला यशस्वीरित्या प्रक्षेपित केले.मी रॉकेट बनवताना ही काळजी घेतली की यामुळे कोणत्याही प्रकारचं प्रदूषण होणार नाही म्हणून तीने पोटॅशियम नाईट्रेट आणि शुगर फ्युलचा वापर करून हे रॉकेट बनवले. भारतातील युवापिढीने ही असच नाविन्यपूर्ण काम करून विकसित भारत मधे आपल्या माननीय प्रधानमंत्री यांच स्वप्न पूर्ण करण्यासाठी बहुमूल्य योगदान द्यावं. आयडीवायमचे रविशंकर कुमार यांनी यावेळी महेश वायाळ आणि पुजा वायाळ यांना शुभेच्छा दिल्या.

जवाहर नवोदय विद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

(विवेक भुतेकर/ दै.धर्मयोध्दा)

मंठा – जवाहर नवोदय विद्यालयात शिक्षणासाठी निवड झालेल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद तालुका शाखा मंठा यांच्या वतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नानसी (पुनर्वसन)या ठिकाणी सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना संघटनेच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे मराठवाडा विभागाचे अध्यक्ष भगवान जायभाय हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून गट साधन केंद्र मंठा चे गट समन्वयक केजी राठोड, दुधना जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था मंठा सचिव उज्जैनकर ,शाळेचे मुख्याध्यापक खरात सर, प्रमोद देशमुख सर मंठा तालुका अध्यक्ष श्री कैलास उबाळे, गजानन चीकाळकर, मुख्याध्यापक दत्तात्रय राऊतवाड, अविनाश लोमटे, बालाजी मोरे, राम किसन मिसाळ, अमोल घुगे , शिवराम इसनकर अतिक पठाण झनक, कराळे सर, श्रीकांत अंभोरे पालक सचिन सोनटक्के, मनोज कायदे किशोर निर्वळ शशिकांत जोशी धनराज खुडे सरकटे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री मनोज भरडे सर यांनी केले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिंटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक–शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao